झोपडपट्टी पुनर्वसन प्राधिकरण,
पुणे व पिंपरी चिंचवड क्षेत्र,
मुथ्था चेंबर्स, सेनापती बापट रोड, पुणे- १६.
जा.क्र. झोपुप्रा/सप्रा१/झोपुआ/१३०५ /२०२५
दिनांक : २६/०६ /२०२५

# झोपडपट्टी पुनर्वसन आदेश (अंतिम)

## महाराष्ट्र झोपडपट्टी (सुधारणा, निर्मुलन व पुनर्विकास) अधिनियम, १९७१ चे कलम ३ क अन्वये अंतिम आदेश

प्रस्तावना -

सि.स.नं.५२, शिवरामदादा तालीम, गणेश पेठ, पुणे येथील अनुसूचीत नमूद केलेल्या क्षेत्रासंदर्भात महाराष्ट्र झोपडपट्टी (सुधारणा, निर्मुलन व पुनर्विकास) अधिनियम, १९७१ च्या कलम ३(क) अंतर्गत खालीलप्रमाणे अंतिम आदेश पारित करण्यात येत आहे.

(१) ज्याअर्थी, महाराष्ट्र झोपडपट्टी (सुधारणा, निर्मुलन व पुनर्विकास) अधिनियम, १९७१ मधील कलम ३(क) मध्ये नमूद तरतुदीनुसार झोपडपट्टी पुनर्वसन क्षेत्र म्हणून घोषित करण्याकरिता मुख्य कार्यकारी अधिकारी, झोपुप्रा, पुणे हे सक्षम आहेत ; आणि

(२) ज्याअर्थी, अनुसूचीमध्ये निर्दिष्ट करण्यात आलेले क्षेत्र झोपडपट्टी पुनर्वसन क्षेत्र म्हणून घोषित करण्याची दि.१५/१०/२०२४ रोजीची पूर्वसूचना प्रकरणातील सविस्तर पार्श्वभूमी नमूद करुन महाराष्ट्र शासन राजपत्र डिसेंबर ०५-११, २०२४ मध्ये पृष्ठ क्र.१२ व १३ वर तसेच दैनिक वृत्तपत्रात दि.०४/१२/२०२४ रोजी प्रसिध्द करण्यात आली आहे. तसेच, सदरची पूर्वसूचना सर्वसाधारणपणे सर्वांना ठळकपणे दिसून येईल अशा प्रत्यक्ष जागेवर दि.२०/११/२०२४ रोजी डकवून प्रसिध्द करण्यात आली आहे ; आणि

(३) ज्याअर्थी अनुसूचीमध्ये नमूद केलेल्या मिळकतीवर झोपडपट्टी असलेने उक्त क्षेत्र तत्कालीन सक्षम प्राधिकारी, पुणे महानगरपालिका, पुणे यांनी सदरचे क्षेत्र महाराष्ट्र शासन राजपत्र दि.३१/१२/१९८४, भाग १ पुरवणी, पृष्ठ क्र.०३ वर प्रसिध्द अधिसूचनेद्वारे उक्त अधिनियमाच्या कलम ४(१) अन्वये गलिच्छ वस्ती म्हणून क्षेत्र घोषित असलेने सदर योजनाक्षेत्र हे झोपडपट्टी क्षेत्र म्हणून घोषित करणेकामी समर्थनीय ठरणारी परिस्थिती अस्तित्वात असल्याबद्दल माझी खात्री झालेली आहे. आणि;

(४) ज्याअर्थी, सदर पूर्वसूचनेची प्रत जागा मालक व पुणे महानगरपालिका यांना देखील देण्यात आली आहे. पूर्वसूचनेद्वारे जागा मालक किंवा इतर यांना त्यांच्या ज्या काही सूचना/हरकती असतील त्या ३० दिवसांचे आत या कार्यालयाकडे सादर करणेबाबत फर्माविण्यात आले होते. सदर दि.१५/१०/२०२४ रोजीच्या झोपडपट्टी पुनर्वसन क्षेत्र घोषित करणेबाबतची पुर्वसूचना नोटीशीस दि.१९/१२/२०२४ रोजी श्री. जयराजसिंग विजयसिंग परदेशी व इतर ५ यांची हरकत प्राप्त झालेली असता सुनावणी अंती दि.२०/०३/२०२५ रोजी संबंधितांचे हरकत फेटाळण्यात येऊन त्याबाबतचे निकालपत्र दि.०२/०६/२०२५ रोजी पारित करणेत आलेले आहे.

त्याअर्थी, उपरोक्त परिस्थितीचे अवलोकन करता महाराष्ट्र झोपडपट्टीच्या कलम ३(क) मधील तरतुदीनुसार खालीलप्रमाणे अंतिम आदेश पारित करण्यात येत आहे.

आदेश :-

(१) सदर झोपडपट्टी पुनर्वसन क्षेत्र घोषित करण्या संदर्भातील दि.१५/१०/२०२४ रोजीची जाहिर नोटीस (झोपडपट्टी पुनर्वसन क्षेत्र घोषीत करण्याची पूर्वसूचना) कायम करुन खालील अनुसूचीमध्ये निर्दिष्ट करण्यात आलेले क्षेत्र या आदेशाद्वारे झोपडपट्टी पुनर्वसन क्षेत्र म्हणून अंतिमत: घोषित करण्यात येत आहे.

(२) सदरच्या आदेशाविरोधात उक्त अधिनियमाच्या कलम ३(क) मधील तरतुदीनुसार प्रस्तुत आदेश प्रसिध्द झालेपासून ३० दिवसांचे आत मा. शिखर तक्रार निवारण समिती, वांद्रे, मुंबई येथे अपील दाखल करणे शक्य आहे.

## अनुसूची

झोपडपट्टीचे नाव :- सि.स.नं.५२, शिवरामदादा तालीम, गणेश पेठ, पुणे
महानगरपालिका क्षेत्र :- पुणे महानगरपालिका.

| गाव | स.नं./ सि.स.नं. | जमीनीचे मालकी हक्क प्राप्त असलेल्या संस्थेचे नाव | क्षेत्र (चौ.मी.) (त्रिमीती पध्दतीने प्रत्यक्ष जागेवरील मोजणी नुसार) | चतु:सिमा | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|
| | | | | पुर्वेस | दक्षिणेस | पश्चिमेस | उत्तरेस |
| गणेश पेठ, पुणे | सि.स.नं. ५२ | खाजगी (शिवरामदादा तालीम देवस्थान ट्रस्ट) | ८११.०४ चौ.मी. | लगत सि.स.नं. १३२, १३३, १३४, १३८ | लगत सि.स.नं. १३९ | लागू बोळ | लागू रस्ता व लगत सि.स.नं.५६ |

सदरचा आदेश हा माझे सहीने व कार्यालयाच्या शिक्क्यासह पारित करण्यात येत आहे.

स्थळ :- झोपडपट्टी पुनर्वसन प्राधिकरण, पुणे
दिनांक :- २६/०६/२०२५.

(नीलेश गडणे) (भा.प्र.से)
मुख्य कार्यकारी अधिकारी,
झोपडपट्टी पुनर्वसन प्राधिकरण,
पुणे व पिंपरी चिंचवड क्षेत्र, पुणे.

प्रत-

१. मा. आयुक्त, महानगरपालिका आयुक्तालय, पुणे महानगरपालिका - यांना माहितीस्तव.
२. मा. जिल्हाधिकारी, जिल्हाधिकारी कार्यालय, पुणे -यांना माहितीस्तव व पुढील कार्यवाहीस्तव.
३. संगणक अधिकारी, झोपुप्रा, पुणे- झोपडपट्टी पुनर्वसन अंतिम आदेश या कार्यालयाच्या संकेतस्थळावर प्रसिध्द करणेत यावा.